# महात्मा ज्योतिबा फुले
## (दि.११ एप्रिल, १८२७ – २८ नोव्हेंबर, १८९०)
## (अल्प परिचय)

महाराष्ट्रातील समाज सुधारकांच्या पहिल्या पिढीतील श्रेष्ठ समाज सुधारक आणि विशेषतः समाजातील श्रमजीवी वर्गाच्या शोषणाची व सामाजिक दास्याची मीमांसा करणारा क्रांतिकारक विचारवंत. गोविंदराव शेटिबा फुले आणि चिमणाबाई या दांपत्याचे ज्योतीराव हे दुसरे अपत्य. मूळचे गोऱ्हे हे उपनाव बदलून फुलांच्या व्यवसायामुळे फुले हे नाव पडले. ज्योतीरावांच्या लहानपणीच त्यांच्या आईचे निधन झाले. ज्योतीरावांना इंग्रजी शिक्षणाचे वेध लागले होते. त्यात अनेक अडचणी आल्या, तरी शालान्त परीक्षेइतके इंग्रजी शिक्षण त्यांनी पुरे केले. इंग्रजीतील उच्च दर्जाचे ग्रंथ समजण्याची पात्रता तसेच इंग्रजीत लेखन करण्याची क्षमताही त्यांनी प्राप्त केली. बौद्धिक शिक्षणाबरोबरच शरीरशिक्षणही घेतले. लहूजीबुवा यांच्यापाशी दांडपट्टा शिकले, मल्लविद्या संपादन केली. शिक्षण पुरे केल्यावर सन १८४० मध्ये ज्योतीरावांचा विवाह खंडोजी नेवसे पाटील यांची कन्या सावित्री हिच्याशी झाला. सावित्रीबाईचे शिक्षण ज्योतीरावांनीच पुरे केले. त्या स्वयंस्फूर्तीने ज्योतीरावांच्या समाजसुधारणेच्या आणि लोकशिक्षणाच्या कार्यात जन्मभर सहभागी झाल्या.

ज्योतीरावांनी आपल्या विचारांचा एक सुबोध व सुंदर, सूत्रबद्ध सारांश सांगितला आहे. "विद्येविना मति गेली; मतीविना नीति गेली; नीतीविना गति गेली! गतीविना वित्त गेले; वित्ताविना शूद्र खचले; इतके अनर्थ एका अविद्येने केले." त्यांनी हा निष्कर्ष "*शेतकऱ्याचा आसूड*" (१८८३) मध्ये सांगितला आहे. त्यांच्या सगळ्या सत्यशोधक चळवळीचा भावार्थ यात आला आहे. दैन्यावस्थेतून बाहेर पडण्याकरिता लोकशिक्षण हाच उपाय आहे, असे त्यांचे मत होते.

ज्योतीराव फुले यांनी "बालहत्या प्रतिबंधक गृहा" ची स्थापना केली (१८६३). या गृहात स्त्रियांच्या बाळंतपणाचीही सोय केली होती. ज्योतीरावांनी दत्तक घेतलेला यशवंत नावाचा मुलगा काशीबाई नावाच्या विधवेचा मुलगा होता. विधवांच्या केशवपनाची चाल बंद व्हावी म्हणून त्यांनी चळवळ उभी केली व त्या करीता न्हाव्यांचा संपही घडवून आणला.

अस्पृश्य व दलितांच्या प्रश्नालाही त्यांनी चालना दिली. अस्पृश्यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न ही एक अत्यंत गंभीर अशी कायमची समस्या लक्षात घेऊन आपल्या वाड्यातील पाण्याचा हौद त्यांनी अस्पृश्यांसाठी खुला केला.

बहुजन समाजावरील मानसिक गुलामगिरी स्पष्ट करण्याकरिता "*ब्राह्मणांचे कसब*" (१८६९), "*गुलामगिरी*" (१८७३), "*सत्सार*" (अंक १ व २, १८८५) इ. निबंध लिहिले.

ज्यांतीरावांचे इतर वाङ्मय पुढीलप्रमाणे आहे :"*छत्रपति शिवाजीराजे भोसले यांचा पवाडा*"(१८६९), *हंटर-शिक्षण आयोगापुढे सादर केलेले निवेदन* (मूळ इंग्रजी-१८८२), "*इशारा*"(१८८५).

******

(स्रोत – सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ)